**BEED DISTRICT PETROL PUMP DEALER ASSOCIATION**

Bharat Petroleum energising lives · इंडियनऑयल IndianOil · **BEED : 431122** · हिन्दुस्तान पेट्रोलियम HP

**Mob. 9422244752/9423378888/9767090900**

दि. 02/ 08 /2021

**प्रति,**

मा. जिल्हाधिकारी साहेब
बीड

**विषय :-** **बनावट बायोडिझेल अनाधिकृत रित्या पंपाद्वारे महाराष्ट्रात व बीड जिल्ह्यात विक्री बाबत.**

महोदय,

वरील विषयास अनुसरुन आम्ही बीड जिल्हा पेट्रोल पंप असोसिएशन आपणास विनंती करतो की, सध्या संपुर्ण भारत भरात व त्यातील त्यात आपल्या बीड जील्ह्यात अनाधिकृत बायोडिझेल विक्री संघटीत पणे अतिशय जोरात चालु आहे.तसेच आपल्या महाराष्ट्र राज्यात असेच अनाधिकृत बायोडिझेल पंप अधिकृत पणे चालु आहेत. आम्ही आपल्या निदर्शनास आणुन देवु इच्छितो की, बायोडिझेल पंप टाकणे व चालविणे असेल तर शासन निर्मीत गॅझेट नोटीफिकेशन दि. 30/04/2019 निर्मीत द्वारा पेट्रोलियम मंत्रालय भारत सरकार तथा बायोडिझेल Policy निर्गमित द्वारा महाराष्ट्र शासन दि. 11/05/2021 यानुसार चालविणे गरजेचे आहे.

या संदर्भात राज्यस्तरीय समन्वयक तेल उद्योग महाराष्ट्र यांनी सविस्तर पत्र सेक्रेटरी महाराष्ट्र राज्य फुड व सिव्हील सप्लाईज अॅण्ड कन्जुमर प्रोटेशन डिपार्टमेंट मंत्रालय, मुंबई - 32 दि. 21/06/2021 Ref.WRSLC16MAHGOVT. यांना दिले आहे. सदरील पत्रात बायोडिझेल पंपा संदर्भात सर्व मार्गदर्शक तत्वे व नियम याचा उल्लेख आहे.

तरी सुद्धा वेगवेगळया स्तरावरुन मिळालेल्या माहितीच्या आधारे खुप प्रमाणात अशा प्रकारची बायोडिझेल पंप महाराष्ट्रात बनावट पध्दतीची मिश्रणे बायोडिझेल या नावाखाली विकत आहे.कुठल्याही प्रकारची शासनाची परवानगी न घेता चालवत आहे. जे की, बायोडिझेल पॉलीसीचे ज्याची मार्गदर्शक तत्वे महाराष्ट्र शासनाने घालून दिली आहेत. दि. 11/05/2021 ज्याचे सर्रास उल्लंघन होत आहे.

कुठल्याही प्रकारची पुर्व परवानगी शासनाद्वारा अथवा /विस्फोटक डिपार्टमेंट न घेत व बायोडिझेल पॉलीसी धोरण निर्गमीत द्वारा महाराष्ट्र शासन दि 11/05/2021 ह्याचे सरळ सरळ उल्लंघन आहे.

कुठल्याही प्रकारची पुर्व परवानगी शासनाद्वारे अथवा / विस्फोटक डिपार्टमेट न घेता व बायोडिझेल

आवक लिपीक
जिल्हाधिकारी कार्यालय, बीड.

आवक लिपीक
पोलीस अधीक्षक कार्यालय, बीड
5/8/21

BEED DISTRICT PETROL PUMP DEALER ASSOCIATION

Bharat Petroleum energising lives · इंडियनऑयल IndianOil · BEED : 431122 · हिन्दुस्तान पेट्रोलियम HP

Mob. 9422244752/9423378888/9767090900

पॉलीसी धोरण निर्गमीत द्वारा महाराष्ट्र शासन दि..11/05/2021 ह्याचे सरळ सरळ उल्लंघन आहे. सद्य परिस्थितीत बायोडिझेल नावाखाली हि आऊटलेस B-100 चत उत्पादन विकत नाहीत जे की, शासन मान्य आहे.त्या ऐवजी त्या नावाखाली बऱ्याच प्रकारची बनावट उत्पादने हि मंडळी विकत आहे.जे की, सद्य परिस्थितीत भारत सरकार अंगिकृत व्यवसाय करणाऱ्या IOCL/BPCL/HPCL द्वारा विक्री करणाऱ्या डिझेल पेक्षा स्वस्त आहे.

अशा प्रकारच्या अनाधिकृत गैरमार्गाने कार्यरत असणाऱ्या कुठल्याही प्रकारचे शासनाचे नियम न पाळणाऱ्या व कुठल्याही प्रकारची रितसर मान्यता / परवानगी नसलेल्या व्यक्तिद्वारा अशा व्यवसायाद्वारा मोठया प्रकारची मानवनिर्मीत हानी तथा पर्यावरणास धोका व तसेच शासनाचा महसुल व आम्हा अधिकृत रित्या शासन मान्य नियमानुसार व परवानगी घेऊन व्यवसाय करणाऱ्यावर महसुल व आम्हा अधिकृत रित्या शासन मान्य नियमानुसार व परवानगी घेवुन व्यवसाय करणाऱ्यावर मोठ्या प्रमाणात आघात होत आहे.या आदीच शासनाने / पेट्रोलिअम कंपन्यांनी कुठल्याही प्रकारचे विधी नियम न पाळता भरमसाठी पंपाना मान्यता दिली आहे.अशा परिस्थीस आम्हास सर्व बाबी बघता व्यवसाय व व्यवसायातील अडचणी लक्षात घेता प्रशासनाने व शासनाने या गोष्टींना वेळीच पायबंद न घातल्यास आम्ही **बीड जिल्हा पेट्रोल पंप धारक स्वातंत्र दिनापासुन (15/08/2021 )पासुन खरेदी बंद आंदोलन पुकारत आहोत.** त्या दिवशी पासून आमच्या कडे भुमीगत उपलब्ध असलेल्या डिझेल अथवा पेट्रोल फक्त अत्यावश्यक सेवा Ambulance/ Police/ यांना उपलब्ध असे पर्यंत देण्यात येईल.तद नंतर बिघडलेल्या कायदा व सुव्यवस्था व्यवस्थेस आम्ही पेट्रोल पंपधारक जबाबदार राहणार नाहीत.

आपणास विनंकी की, ताबडतोब या संदर्भात योग्य ती कायदेशीर कार्यवाही करण्यात यावी.व अवैद्य धंद्याना प्रतिबंध करावा ही विनंती.

**आपले विश्वासू,**

सोबत :-

1. राज्य स्तरीय समन्वयक तेल उद्योग महाराष्ट्र राज्य यांचे पत्र
2. The gazette of India (भारत का राजपत्र)

**अध्यक्ष** **उपाध्यक्ष**

**बीड जिल्हा पेट्रोलपंप डिलर असोसिएशन,बीड**

अध्यक्ष उपाध्यक्ष
बीड जिल्हा पेट्रोलपंप डिलर असोसिएशन, बीड

प्रतिलीपी :-

1. मा . ना. मुख्यमंत्री , महाराष्ट्र राज्य, मुंबई - 32
2. मा. ना. श्री. अन्न व नागरी पुरवठा मंत्री, महाराष्ट्र राज्य, मुंबई -32
3. मा. ना बीड जिल्हा पालमंत्री तथा सामाजिक न्याय मंत्री , महाराष्ट्र राज्य,
4. मा. खा.लोकसभा संसद, बीड
5. मा.जिल्हाधिकारी, बीड
6. मा. पोलीस अधिक्षक , बीड